महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. - ४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-संकिर्ण-४७२१/प्र.क्र.१७/एसएम-२ दिनांक:- २१ जून, २०२१

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक, *तथा*
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
पुणे विभाग, पुणे.

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा तथा विद्यमान शाळेची दर्जावाढ मान्यतेबाबत...

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२, दि. १९.०१.२०१३
२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२०, दि. ०५.१०.२०२०

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० दिनांक ०५.१०.२०२० रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर नियमांन्वये नवीन शाळा मान्यता तथा विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्याकरीता अर्ज करण्याची कार्यपध्दती, इरादा पत्र देण्याची कार्यपध्दती तसेच मान्यता पत्राकरीता अर्ज करण्याची व मान्यता पत्र देण्याची कार्यपध्दती विहित केलेली आहे. त्याचप्रमाणे अर्ज स्वीकारण्यासाठी आणि त्यांची छाननी करण्यासाठी राज्यस्तरीय प्राधिकारी आणि क्षेत्रस्तरीय प्राधिकारी यांची नियुक्ती, त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती यांबाबतही नियमांमध्ये तरतुद करण्यात आली आहे.

२. उपरोक्त स्वयं अर्थसहाय्यित नियमातील निमय क्र. १५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील नमुद संस्थेचा/संस्थांचा दर्जावाढीचा नवीन शाळा/दर्जावाढ ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात आला/आले असून सदर अर्ज सोबत जोडून पाठविण्यात येत आहे/आहेत.:-

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | मंडळ | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अॅकडमी ऑफ इंजिनिरिंग अँड एज्युकेशनल रिसर्च, पुणे | डॉ विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कुल, आळंदी, पुणे | इंग्रजी | सीबीएसई | नवीन उच्च माध्यमिक शाळा. (इ. ११ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा) |

३. तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मध्ये विहित केलेल्या निकषांनुसार उपरोक्त वरील प्रस्तावांची छाननी करुन, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० मधील नियम ३ मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. ही विनंती.

प्र.सु.पडोळे

(प्रदिप पडोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
ई मेल-dydpune @ gmail.com वेबसाईट-www.dydepune.com दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२२१७

जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-४०१/२०२०-२१ /५६६८ दिनांक- 03 AUG 2021

प्रति,

मा. अप्पर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व कीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्यासाठी अर्ज (इरादापत्राकरिता)

**नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल**

**डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पिस स्कूल आंळदी पुणे**

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व कीडा विभाग,मंत्रालय,मुंबई कडील महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) नियम २०२० अधिसूचना दि.०५.१०.२०२०
२) कक्ष अधिकारी,शालेय शिक्षण व किडा विभाग मंत्रालय,मुंबई यांचे जा.क.संकिर्ण-४७२१ /प्र.क.१७/एसएम-२ दि.२१.०६.२०२१ चे पत्र
३) या कार्यालयाचे जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-४०१/२०२०-२१/४४७६ दि.२९.०६.२०२१
४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे तथा सदस्य, क्षेत्र प्राधिकरण,पुणे विभाग यांचेकडील समिती सदस्याचे स्वाक्षरीसह या कार्यालयास प्राप्त प्रस्ताव दि.२९ .०६.२०२१

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा इरादापत्र मिळणेसाठी पुढील अर्ज प्राप्त झाला आहे आणि उक्त अर्जाचे संबधित पुढील निर्णय घेण्यात आला आहे.

संदर्भिय क.२ व्दारे प्राप्त पत्र व संदर्भीय १ च्या अधिसूचनेतील मुददा क.१५ मधील नमूद नियम ३ नूसार व सदस्य, क्षेत्र प्राधिकरण,पुणे विभाग तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडून समिती सदस्यांचे स्वाक्षरीसह सदर्भीय कमांक ४ व्दारे प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने खालीलनुसार उक्त शाळेस इरादापत्र मिळणेस्तव प्रस्ताव सादर करीत आहोत.

स्विकार व्हाव ही विनंती

| अ.क | संस्थेचे नाव | नवीन शाळेचे नाव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचे प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनियरींग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च पुणे | डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पिस स्कूल आंळदी पुणे | सी.बी.एस.ई | उच्च माध्यमिक शाळा (इ.११ वी ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी | उच्च माध्यमिक शाळा (इ.११ वी ते १२ वी सर्व शाखा) |

आपला विश्वासू

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

**प्रत, माहितीसाठी सविनय सादर :-**

मा. शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे तथा सदस्य ,राज्यस्तरीय प्राधिकरण